ग्रामीण पाणी पुरवठा संबंधित योजनांकरिता स्त्रोत निश्चित करण्यासाठी सक्षम खाजगी सेवा पुरवठादारांच्या सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
शासन निर्णय क्र.ग्रापापु- १००५/प्र.क्र.६१/पापु-०७
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
दिनांक २९ एप्रिल २००५

वाचा: शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्र. ग्रापापु-१००४/प्र.क्र.२३४/पापु-०७, दिनांक ३१ डिसेंबर २००४.

**प्रस्तावना:**

राज्यातील किमान गरजा कार्यक्रम, पंतप्रधानांनी जाहीर केलेला पाणी टंचाई निवारणासाठी उपाययोजनांचा कार्यक्रम, राज्य शासनाच्या टंचाई कार्यक्रमांतर्गत योजना व लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या इतर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यकतेनुसार स्त्रोत सर्वेक्षण, स्त्रोत निश्चितीकरण व प्रमाणीकरण करून घेण्याकरिता खाजगी सेवा पुरवठादारांच्या सेवा विहित कमाल दरांच्या मर्यादेमध्ये उपलब्ध करून घेण्याची मुभा ग्रामपंचायतींना व ग्रामपंचायती अंतर्गत गठीत ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितींना, जिल्हा परिषदांना व इतर यंत्रणांना संदर्भातील दिनांक ३१ डिसेंबर, २००४ च्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आली आहे. यासाठी सेवा पुरवठादारांची यादीही सदर शासन निर्णयासोबत देण्यात आली आहे व आवश्यकतेनुसार ही यादी वाढविण्याचे अधिकार संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांना देण्यात आले आहे.

२. राज्यातील काही जिल्हयांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाईची स्थिती लक्षात घेता या खाजगी सेवा पुरवठादारांची संख्या फारच कमी असल्याने टंचाईच्या व इतर नियमित पाणी पुरवठा योजनांसाठी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण करण्यासाठी जिल्हास्तरावर उपलब्ध खाजगी सक्षम संस्थांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याचे अधिकार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्याची मागणी करण्यात आली आहे.

३. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मागणी व राज्यातील काही जिल्हयांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाईची स्थिती लक्षात घेऊन, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची निश्चिती करण्यासाठी सक्षम खाजगी सेवा पुरवठादारांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याचे अधिकार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

९५ २३०... १०१

**शासन निर्णय:**

संदर्भातील दिनांक ३१ डिसेंबर २००४ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सेवा पुरविण्यासाठी खाजगी सेवा पुरवठादार उपलब्ध होत नसतील तर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे स्त्रोत निश्चित करण्यासाठी जिल्हास्तरावर सेवा पुरवठादारांची यादी तयार करण्याचे अधिकार जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत. अशा सेवा पुरवठादार व्यक्तीकडे/संस्थेकडील व्यक्तींकडे **भूगर्भशास्त्र किंवा भूभौतिकशास्त्रातील किमान पदव्युत्तर पदवी असावी.** तसेच उपरोक्त शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद आवश्यक शास्त्रीय उपकरणे असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे निश्चित केलेल्या सेवा पुरवठादारांकडून संदर्भिय दिनांक ३१.१२.२००४ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या शासनमान्य दरांच्या अधिन राहून सेवा उपलब्ध करून घेण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना परवानगी देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व तहसीलदार
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.